# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.11.2025** **वारः गुरुवार**

---

१. अर्थ मंत्रालयाच्या स्टार्ट अप एकात्मिक अर्ज सुविधेचं उद्घाटन

२. ऑक्टोबर महिन्यात किरकोळ महागाई दरात घट

३. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नागरिक केंद्रित आणि जबाबदार प्रशासन व्यवस्था निर्माण करावी- मुख्यमंत्र्यांचं आवाहन

४. राज्यातल्या शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासाठी नेमलेल्या समितीचा आज पुण्यात जनसंवाद आणि

५. टाइप फाईव मधुमेहाच्या संशोधनात पुण्यातल्या केईएम रुग्णालयातील मधुमेह विभाग प्रमुख डॉक्टरांचा सहभाग

**वित्तीयसेवापोर्टल**

अर्थ मंत्रालयाच्या अखत्यारितील वित्तीय सेवा विभागानं जनसमर्थ पोर्टलवर स्टार्टअपसाठी एकात्मिक अर्ज सुविधेचा काल आरंभ केला. स्टार्ट अप कंपन्यांना एकाच ठिकाणी सर्व, सार्वजनिक बँकांची पत पुरवठा सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशानं ही सेवा सुरू करण्यात आली आहे. या पोर्टलवरुन स्टार्ट अप्सना कर्जासाठी अर्ज दाखल करण्यासह विविध बँकांच्या व्याज दराची तुलना करता येईल तसंच त्यांच्या अर्जावरील बँक प्रक्रियेचा मागोवाही घेता येईल. या सुविधेद्वारे स्टार्ट अप्सना पत हमी योजनेअंतर्गत एकंदर २० कोटी रुपयांपर्यंत कर्जं दिली जाणार आहेत.

**महागाईदर**

सप्टेंबर महिन्याच्या तुलनेत ऑक्टोबर महिन्यात देशातला किरकोळ महागाई दर पाव टक्क्यानं कमी झाला आहे. सांख्यिकी आणि उपक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात महागाई दरात बरीच घट झाली आहे. सलग पाचव्या महिन्यात अन्नधान्याचा महागाई दर कमी झाला असून वस्तू आणि सेवा करातील सुधारणा हे ऑक्टोबर महिन्यात महागाई दर कमी होण्याचं प्रमुख कारण असल्याचं मंत्रालयानं नमूद केलं आहे.

**<u>कृषीमंत्री</u>**

शेती हा देशाच्या संस्कृतीचा पाया आहे. पाश्चिमात्य देशांच्या कितीतरी आधी भारतानं आपलं स्वदेशी बियाणं विकसित केलं होतं असं केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी म्हटलं आहे. वनस्पती विविधता आणि शेतकरी हक्क संरक्षण प्राधिकरणाच्या २१ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते काल नवी दिल्लीत बोलत होते. शेतकऱ्यांना बियाणांच्या विविध वाणांचं संवर्धन करण्यासाठी आवश्यक सुविधा उभारता याव्यात म्हणून सरकारनं १५ लाख रुपयांची तरतूद केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>मुख्यमंत्री</u>**

समाजातील शेवटच्या घटकाचं कल्याण हे ध्येय ठेवत, त्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची ताकद प्रशासनात आहे असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. २०२४ च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील आठ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांशी काल मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. या अधिकाऱ्यांकडून राज्याच्या विकासगाथेला पुढे नेण्याची जबाबदारी सार्थपणे सांभाळण्याची अपेक्षा फडणवीस यांनी व्यक्त केली. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा उपयोग करत नागरिक केंद्रित आणि जबाबदार प्रशासन व्यवस्था निर्माण करावी, असं आवाहन त्यांनी केलं. राज्यातल्या प्रशासकीय कामकाजातील सुधारणांची आणि विकास कामांची माहिती यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

**<u>आंतरराष्ट्रीयव्यापारमेळा</u>**

भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्याचं उद्घाटन उद्या नवी दिल्लीत होणार असून यातील महाराष्ट्राच्या दालनाचं उद्घाटन उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळानं उभारलेल्या या दालनात महिला बचत गट, महिला उद्योजकांच्या दालनांसह एकंदर ६० दालनं असतील.

या मेळ्यात परवा शनिवारी राज्याची समृद्ध कला आणि संस्कृती दर्शवणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे.

**<u>वस्त्रोद्योगनिर्यात</u>**

वर्तमान आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यात भारताची कापड आणि पोशाख निर्यात लक्षणीय प्रमाणात वाढली आहे. जागतिक अस्थिरता आणि आयातशुल्क वाढीचं आव्हान असूनही एप्रिल ते सप्टेंबर या काळात ही निर्यात ८ हजार ४ शे ८९ दशलक्ष अमेरिकी डॉलर्सवर गेल्याची माहिती वस्त्रोद्योग मंत्रालयानं दिली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत वस्त्रोद्योग निर्यात दहा टक्के वाढल्याचं मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>साउंडबाइटत्रिभाषा</u>**

**<u>इंट्रो</u>**

राज्यातल्या शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासाठी नेमलेली शिक्षणतज्ज्ञ डॉक्टर नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समिती विभागनिहाय भेटी देऊन विविध घटकांशी संवाद साधत आहे. आज पुण्यात विधानभवन कौन्सिल इमारतीत झुंबर दालनामध्ये सकाळी १० वाजेपासून या समितीचा जनसंवाद आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात पुण्यातील शिक्षणाशी संबंधित सर्वच घटकांना सहभागी होण्याचं आवाहन करताना डॉक्टर नरेंद्र जाधव म्हणाले,

**<u>साउंडबाइट</u>**

**<u>इंट्रो</u>**

कुपोषण किंवा अल्प पोषणामुळं मधुमेह होऊ शकतो का? त्याची नेमकी कारणं आणि योग्य उपचार काय याबाबत लॅन्सेट या जागतिक स्तरावरील वैद्यकीय नियतकालिकात एक शोधनिबंध प्रकाशित झाला आहे. या शोधनिबंधाच्या लेखकांपैकी एक डॉक्टर चित्तरंजन याज्ञिक पुण्यातल्या केईएम रुग्णालयात मधुमेह विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. या संशोधनाविषयी आकाशवाणीला माहिती देताना ते म्हणाले...

**<u>कॅबिनेट</u>**

नवी दिल्लीत लाल किल्ल्याजवळ एका दहशतवादी घटनेत मृत्यु पावलेल्या लोकांप्रती दुःख व्यक्त करणारा ठराव काल केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत स्विकारण्यात आला. काही क्षण मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आणि देशाचे नागरिक आणि राष्ट्रीय सुरक्षितता यांना सर्वोच्च प्राधान्य देत सर्व स्वरुपातील दहशतवादाच्या विरोधात कठोर कारवाई करण्याचा निर्धार या ठरावात करण्यात आला असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं.

**<u>जलपुरस्कार</u>**

नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था गटात नवी मुंबई महापालिकेला राष्ट्रीय स्तरावरचा प्रथम पुरस्कार मिळाला आहे. पुढच्या आठवड्यात मंगळवारी नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

**<u>ओंकार-कोल्हापूर</u>**

सिंधुदुर्ग-कोल्हापूर सीमेवर कळपापासून विलग झाल्यामुळं भटकणाऱ्या ओंकार हत्तीला तात्पुरतं गुजरातमधील वनतारा केंद्रामध्ये पाठवून उच्चस्तरीय चौकशी समितीद्वारे पुढील कार्यवाही करण्याचे आदेश कोल्हापूर सर्किट बेंचच्या न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आणि न्यायमूर्ती अजित कडेठणकर यांनी काल दिले. प्राध्यापक रोहीत कांबळे यांनी यासंदर्भात जनहित याचिका दाखल केली होती.

**<u>मल्लखांब</u>**

१९ वर्षांखालील शालेय मुलामुलींच्या राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेचं उद्घाटन काल सांगली जिल्ह्यात झालं. या स्पर्धेतील विजयी खेळाडू मध्य प्रदेशात उज्जैन इथं होणाऱ्या राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणार आहेत.

**<u>दृष्टीहीनक्रिकेट</u>**

दृष्टीहीन महिलांच्या २० षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या विश्व करंडक स्पर्धेत काल भारतीय संघानं ऑस्ट्रेलियाच्या संघावर २०९ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघानं २९२ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या संघाला मात्र २० षटकांत सर्व गडी बाद ८३ धावाच करता आल्या. भारतातर्फे कर्णधार दीपिकानं ५८ चेंडूत ९१ धावा केल्या.

**<u>हवामान</u>**

राज्यात नाशिक, जळगांव, मालेगांव, गोंदिया, यवतमाळ इत्यादी ठिकाणी पारा दहा अंशांपर्यंत खाली आला आहे. इतर ठिकाणीदेखील किमान तापमानात घट झाली आहे. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**